**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्र)वस्त्रोद्योग संचालनालय,
महाराष्ट्र शासन, जुने सचिवालय, जीपीओसमोर, नागपूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग
कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग
कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

शरद सहकारी सूत गिरणीच्या स्थापनेपासूनची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून मिळाली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी आपला अर्ज सूतगिरणीकडे पाठविला व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नेमून माहिती देण्याच्या सूचना त्यांना दिल्या. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी न नेमण्याबद्दल सूतगिरणीच्या व्यवस्थापनावर कारवाई करण्याची मागणी आपण केली होती. परंतु तशी कारवाई प्रादेशिक उपसंचालक यांनी केली नाही. अपिलाची योग्य दखल अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (प्र) वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, जुने सचिवालय, नागपूर यांनी घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गुलाबहुसेन कासीमसाहेब शेख यांनी केले.

श्री.शेख यांनी मागितलेली माहिती सूतगिरणीच्या पातळीवरील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. जन माहिती अधिकारी नेमण्याच्या सूचनाही त्यासोबत दिल्या. तसेच माहिती देण्याबाबत स्मरणपत्रही पाठविले. तरीही माहिती न मिळाल्यामुळे श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (प्र) वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, जुने सचिवालय, नागपूर यांच्याकडे अपील केले. अपिलाच्या सुनावणीला वारंवार संधी देऊनही श्री.शेख उपस्थित राहिले नाहीत. श्री.शेख यांनी मागितलेली माहिती देण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे

सूतगिरणीने कळविले, याची नोंद घेऊन श्री.शेख यांचे अपील फेटाळण्यात आले, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री.ए.डी.भांडवलकर यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एम.डी.पवार यांनी या निवेदनासह संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या.

श्री.शेख यांच्या अर्जात विस्तृत माहितीची मागणी केली असून त्यामागील भूमिका निवेदनाद्वारे विस्ताराने मांडली आहे. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा शास्तीबाबतच्या म्हणण्यासह अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच अपीलकर्त्यास एक आठवड्यात माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२३.४.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने श्री.शेख यांना माहिती पाठविल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांनी सादर केला. 'अर्जदारास त्यांचे विनंतीनुसार त्यांना व्यक्तिशः गिरणीच्या कार्यालयात बोलावून आवश्यक माहिती तोंडी दिली होती. तसेच गिरणीचा अहवालही दिला होता. दिलेल्या माहितीमुळे समाधान होऊन अर्जदाराने सदर माहितीसाठी अपील करणार नसल्याचे मान्य केले होते. परंतु त्यांनी मान्य करूनही अपील केल्याने दरम्यानचे काळात आमच्याकडून माहिती देण्यास विलंब झाला,' असे चेअरमन/अकौंटंट शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित नान्नज, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर श्री.विश्वनाथ बी. चाकोते यांनी खुलाशात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता सूतगिरणीच्या पातळीवरील माहितीबाबत काटेकोर व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. गिरणीचे अध्यक्ष श्री.विश्वनाथ बी चाकोते यांनी याबाबत त्वरित दखल घेऊन कार्यवाही करण्याची जबाबदारी पार पाडावयास हवी होती. त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) संस्थेची माहिती देण्याबाबत केलेल्या व्यवस्थेचा अहवाल अध्यक्ष, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, नान्नज, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर यानी दि.२५.८.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे
२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी, कार्यालय सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे<br>२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,<br>जिल्हाधिकारी, कार्यालय सोलापूर श्री. हेमंत पुंडलिक निकम | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या दि. १५.४.२००८ च्या अर्जानुसार मागितलेली माहिती दि. १५.४.२०१० रोजी मिळाली. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी, कार्यालय सोलापूर यांनी आठ दिवसांत ऊर्वरित माहिती निःशुल्क द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी दि. २६.५.२००८ रोजी दिल्यानंतरही माहिती

मिळाली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी व आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी केली.

संदर्भित कार्यालयात अनेक पदे रिक्त असल्यामुळे विविध अधिकाऱ्यांकडे जन माहिती अधिकारी पदाचा कार्यभार देण्यात आला होता. श्री. अक्कलकोटे यांनी अन्य काही कर्मचाऱ्यांच्या संदर्भात तीन वर्षांच्या कालावधीतील विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार व त्या अनुषंगाने आपण केलेले अर्ज, त्यावरील कार्यवाही अशी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. हेमंत पुंडलिक निकम यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी विलंबाच्या कारणांसह शास्तीबाबत आठ दिवसांत लेखी खुलासा आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. हेमंत पुंडलिक निकम यांनी दि. २३.४.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. श्री. अक्कलकोटे यांच्या दि. १५.४.२००८ च्या अर्जानुसार कार्यालयाकडील सर्व माहिती दि. ५.५.२००८ रोजी त्यांनी दिली. त्यानंतर माहिती अपुरी असल्याच्या कारणावरून त्यांनी केलेल्या अपिलाचा निर्णय आपल्याला संबंधित लिपिक, सहाय्यक माहिती अधिकारी यांनी कळविला नाही, त्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. तसेच या कालावधीत अप्पर चिटणीस; तहसीलदार; उत्तर सोलापूर, तहसीलदार; बार्शी, तहसीलदार; माढा, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी इत्यादी पदांचा अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे होता, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, माढा श्री. उत्तम दिघे यांनी या खुलाशात नमूद केले आहे.

उपरोक्त कार्यालयातील अन्य जन माहिती अधिकारी श्री. बी. बी. वाघमोडे यांनी दि. २०.४.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. संबंधित लिपिक, सहाय्यक, व माहिती अधिकारी यांना माहिती देण्याबाबत आपण सूचना दिल्या होत्या. त्यांनी दिलेली माहिती अपुरी असल्याचे आपल्या निदर्शनास आणले नाही, तसेच दरम्यानच्या काळात करमणूककर अधिकारी, विशेष कार्यकारी दंडाधिकारी, चिटणीस, तहसीलदार, उत्तर सोलापूर या पदांचा कार्यभार आपल्याकडे होता. एवढया कामाच्या प्रचंड ताणामुळे ऊर्वरित माहितीची पूर्तता स्वतः लक्ष देऊन करणे शक्य झाले नाही, असे श्री. वाघमोडे यांनी खुलाशात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता माहिती अपुरी व विलंबाने देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत, अशा निष्कर्षाप्रत येत येत नाही. उपलब्ध माहिती तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिली आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेल्या अन्य तपशिलाबाबत त्यांना संबंधित कर्मचाऱ्यांनीवेळीच कळविणे आवश्यक असूनही कळविले गेले नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापना शाखा त्यास जबाबदार ठरते, त्यांच्यावर नाममात्र दंडाची कारवाई व्हावी, अशी अपीलकर्ता श्री.अक्कलकोटे यांनी दि. १४.४.२०१० च्या पत्रान्वये केली असून ती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापना शाखेतील संबंधित कर्मचाऱ्यांना नाममात्र रू.२५०/- शास्ती लावण्यात येत असून सदरची शास्ती संबंधितांच्या सप्टेंबर, २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून वसूल करावी. ही रक्कम '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी संबंधितांकडून ही रक्कम वसूल करून दि. ५.९.२०१० पर्यंत आयोगास अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेश जर्नादन बंडगर
रा. ए-१०, पंधारकर पार्क, सिध्देश्वर नगरजवळ,
नवीन आर.टी.ओ.ऑफीस, विजापूर रोड, सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर<br>जि. सोलापूर श्री. जी. एस. सांगडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. ए. जे. भोसले | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. राजेश जर्नादन बंडगर यांनी चॅप्टर केससंबंधी माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर यांनी तत्कालीन

लिपिक यांच्याकडे माहिती देण्यासाठी अर्ज वर्ग केला. परंतु त्यांनी देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने कार्यवाही झाल्याशिवाय घेणार नसल्याचे सांगून नकार दिला. त्यामुळे टपालाचा देय दाखला घेऊन माहिती पाठविली व नंतर समक्ष दिली. चॅप्टर केसबाबत कार्यवाही करून माहिती देण्याची अपीलकर्त्याची मागणी आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. ए. जे. भोसले यांनी नमूद केले. अपीलकर्त्याची माहिती मिळाल्याची पोहच त्यांनी सादर केली.

माहिती-मागणीच्या अर्जावर विहित मुदतीत काटेकोरपणे लेखी स्वरूपात कार्यवाही करण्याची समज लिपिक श्रीमती एस. बी. सोनवणे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामचंद्र प्रल्हाद पवार
बालाजी निवास, आदर्शनगर,
बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती मोहोळ,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)**
जिल्हा परिषद उपविभाग मोहोळ,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११३/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १४/०७/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.रामचंद्र प्रल्हाद पवार<br>बालाजी निवास, आदर्शनगर,<br>बार्शी, जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)**<br>जिल्हा परिषद उपविभाग मोहोळ, जि.सोलापूर<br>श्री.बी.एस.वझरकर | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**<br>पंचायत समिती मोहोळ, जि.सोलापूर<br>श्रीमती मनिषा देसाई |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे बिटळे, बोपले व काळेवाडी येथील पाझर तलावाच्या संदर्भातील माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१४/७/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला दि.३/१२/२००८ रोजी मिळाली असल्याने माझे आयोगाकडील अपील निकाली काढावे', असे निवेदन दि. २७/१२/२००८ रोजी दिले असल्याचे अपीलकर्ता श्री.पवार यांनी सुनावणीच्या वेळी लेखी स्वरुपात दिले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 15 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत वासुदेव खरात
चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,<br>पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.एस.डी.बाबर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज केला नव्हता. मोघम स्वरूपाचा तक्रार अर्ज केला होता. विस्तार अधिकारी (पंचायत) या पदावरून दि.४.७.२००७ पासून त्यांना निलंबित करण्यात आले. तेव्हापासून माहितीच्या अधिकारातील व अन्य स्वरूपाचे अर्ज केवळ त्रास देण्याचे हेतूने करीत आहेत. जुलै २००७ ते सप्टेंबर २००८ या काळात दहा अर्ज त्यांनी केले आहेत. त्या त्या वेळी त्यांच्या अर्जाला उत्तरे व माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.डी.बाबर यांनी केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत वासुदेव खरात
चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.उत्तमराव महादेव वाघमोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.वल्लभ वासुदेव दामोदरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता निलंबित विस्तार अधिकारी असून त्यांनी तीन अर्ज करून उपस्थिती प्रमाणपत्राची मागणी माहितीच्या अधिकारात केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत त्यांची मागणी येत नसूनही संबंधित प्रमाणपत्रे त्यांना देण्यात आली आहेत, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.वल्लभ वासुदेव दामोदरे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.उत्तमराव महादेव वाघमोडे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकरराव भिकोबा गिरमे
मु.पो.माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाययक निबंधक, सहकारी संस्था,
अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, शुगरकेन प्रोड्यूसर्स, विविध
कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्यादित, माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा सहाययक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.बी.डी.मोहिते | |
| | **जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, शुगरकेन प्रोड्यूसर्स, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्यादित, माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.शेखर दत्तात्रय भडके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी यांनी अपील फेटाळून एकतर्फी निर्णय दिला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मधुकरराव भिकोबा गिरमे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.गिरमे यांनी एका साध्या अर्जाद्वारे विविध स्वरूपाचे प्रश्न विचारले होते. खुलासा, भाष्य, अभिप्राय, अन्वयार्थ अशा स्वरूपाची मागणी त्यांनी केलेली असूनही त्यांच्या पत्राला मुद्देनिहाय उत्तर व माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, शुगरकेन प्रोड्यूसर्स, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्यादित, माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.शेखर दत्तात्रय भडके यांनी पूरक कागदपत्रांसह केले. या सर्व बाबींचा उहापोह करून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी श्री.गिरमे यांचे अपील अमान्य केले असल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.बी.डी.मोहिते यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एस.आर.शेख
प्रमाणित लेखापरीक्षक सह.संस्था,
ता.राहुरी,जि.अहमदनगर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर निबंधक,
सहकारी संस्था (ले.प.),सहकार आयुक्त यांचे कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे -१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विशेष लेखा परीक्षक,
सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३२+२९६९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०७.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर निबंधक,<br>सहकारी संस्था (ले.प.),सहकार आयुक्त यांचे कार्यालय,<br>मध्यवर्ती इमारत, पुणे -१ श्री.एस.डी.मून<br>**जन माहिती अधिकारी तथा** विशेष लेखा परीक्षक,<br>सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त कार्यालय,<br>मध्यवर्ती इमारत, पुणे -१ श्री.आर.डी.बिक्कड | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकार खात्याकडे आपण केलेल्या तक्रारींबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक,सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त कार्यालय,मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था (ले.प.),सहकार आयुक्त यांचे कार्यालय,मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी ठोस कार्यवाही करण्याऐवजी

जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक,सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत,पुणे -१ श्री.आर.डी.बिक्कड यांनाच माहिती देण्याबाबत दोन पत्रे पाठविली. तरीही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. दोन्ही अधिकारी जाणून बुजून दिरंगाई करीत आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.एस.आर.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

सहकार खात्याकडील एखादे परिपत्रक रद्द करणे, लेखा परीक्षकांची नावे कमी करणे आदि स्वरुपाच्या तक्रारी व मागण्या करणारी पत्रे श्री.शेख यांनी पाठविली असून प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीचा हा भाग आहे. त्या त्या वेळी त्यांच्या पत्रावरील / तक्रारीवरील निर्णय त्यांना कळविण्यात आला तीच माहिती जन माहिती अधिकारी या नात्याने पुन्हा पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक,सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत,पुणे श्री.आर.डी.बिक्कड व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था (ले.प.),सहकार आयुक्त यांचे कार्यालय,मध्यवर्ती इमारत,पुणे श्री.एस.डी.मून यांनी केले.

प्रशासकीय कार्यवाही व माहिती याची सरमिसळ उभय बाजूंनी केली असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत ते अपेक्षित नाही. जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहितीची नेमकी, योग्य मागणी, जन माहिती अधिकाऱ्यांकडून विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत अपिलाचा निर्णय देणे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत नेमकेपणाने कार्यवाही करण्याची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विरप्पा विश्वनाथ कुंभार
२० क, सोनमातानगर, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य हायस्कूल
व कनिष्ठ महाविद्यालय, एम.आय.डी.सी., अक्कलकोट रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

अपीलकर्ता श्री.विरप्पा विश्वनाथ कुंभार
२० क, सोनमातानगर, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, एम.आय.डी.सी., अक्कलकोट रोड, सोलापूर श्री.एस.एम.धुमशेट्टी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

संस्था विनाअनुदानित असताना आपल्याकडून काम करून घेतले व सन १९९१-९२ मध्ये संस्था अनुदानित झाल्यावर आपल्याला अकारण कमी केले. जन माहिती अधिकारी तथा श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, एम.आय.डी.सी., अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी त्याबाबतची माहिती अपूर्ण व चुकीची दिली. सन १९९१-९२ चा शिक्षणाधिकाऱ्यांचा तपासणी अहवाल अद्याप दिलेला नाही. सन १९९१-९२ पासून आर्थिक नुकसानीची व्याजासह रक्कम मिळावी, निवृत्तीवेतन मिळावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विरप्पा विश्वनाथ कुंभार यांनी केली.

अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती दिली. अन्य मुद्दे स्पष्टीकरणाची मागणी करणारे होते. परंतु त्या स्वरूपाची माहितीही द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिला, त्यानुसार तीही माहिती दिली. तपासणी अहवालाचे कागदपत्र उपलब्ध नसल्याचे श्री.कुंभार यांना कळविले.त्यांची खात्री पटण्यासाठी सर्व

कागदपत्रे आधी व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळीही दाखविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, एम.आय.डी.सी., अक्कलकोट रोड, सोलापूर श्री.एस.एम.धुमशेट्टी यांनी केले.

श्री.कुंभार यांना हवे असलेले शिक्षणाधिकारी यांचे अहवाल पाच वर्षांपर्यंत जतन केले जातात, त्यामुळे सन १९९१ -९२ चे अहवाल उपलब्ध नाहीत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बापू भिवा काळेल
रा. वळई, पो. विरळी, ता. माण, जि.सातारा .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, फलटण, जि. सातारा .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग यांचे कार्यालय,
ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४/ २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १९.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. बापू भिवा काळेल<br>रा. वळई, पो. विरळी, ता. माण, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,<br>फलटण उपविभाग, फलटण, जि. सातारा श्री. धनाजी पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,<br>उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग यांचे कार्यालय,<br>ता. फलटण, जि. सातारा श्री. एन. आर. जगदाळे | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ऊरमोडी धरण प्रकल्पात आपल्या भावाची जमीन न घेता आपल्या एकट्याची जमीन घेतली, या अन्यायाविरुध्द दाद मागितली असता निवारण होत नाही व माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बापू भिवा काळेल यांनी केली.

जानेवारी १९९९ मध्ये भूसंपादन झाले असून त्याबाबत श्री. काळे यांनी मागितलेल्या चारही मुद्दयांची माहिती दिली आहे. मूळ भूसंपादन आदेशात बदल करण्याचा अधिकार आपल्याला नसल्याचे त्यांना कळविले आहे. त्यांची अन्य तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी, फलटण यांचे कार्यालय श्री. एन. आर. जगदाळे व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग श्री. धनाजी पाटील यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि. पुणे .. उत्तरवादी

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त क्र.४,
टिळक रोड, पुणे-३०

१. **जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि. पुणे

२. **जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
हडपसर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५ / २०१० / पुणे +<br>१०७८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि. पुणे श्री. चंद्रकांत वाघमारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि. पुणे श्री. बी. टी. पवार | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे मंहमदवाडी ग्रामपंचायतीकडील अभिलेखातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हवेली यांच्याकडून मिळाली नाही. ग्रामपंचायत सन १९९७ मध्ये पुणे महानगरपालिकेत समाविष्ट होताना सर्व अभिलेख महानगरपालिकेकडे देण्यात आले असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधवा, असे जन माहिती अधिकारी

तथा विस्तार अधिकारी, (पंचायत), पंचायत समिती, हवेली व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, हवेली पंचायत समिती यांनी कळविले. (अपील क्र. ११५/पुणे). त्यानुसार पुणे महानगरपालिकेकडे केलेल्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, हवेली यांनी पूर्ण माहिती दिली नाही. ती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. तुषार बाळासाहेब शिवले यांनी केली (अपील क्र. १०७८ /पुणे ).

अपील क्र. ११५ मध्ये जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचायत), पंचायत समिती, हवेली व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, हवेली पंचायत समिती यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

अपील क्र. १०७८ मध्ये जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, हडपसर क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. 'महंमदवाडी ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासूनच्या नमुना क्र.८ च्या उताऱ्यांची नक्कल' अशी सरसकट मागणी अपीलकर्त्याने केली आहे. संबंधित अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक असलेल्या प्रतींबाबत पत्र देऊन योग्य ते शुल्क भरून या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील क्र. ११५/२०१०/पुणे अमान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र. १९७८/ २०१० / पुणे अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

३. अपील क्र. १९७८ मध्ये अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीबाबतच्या संचिकेचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, हडपसर क्षेत्रिय कार्यालय, हडपसर यांनी करू द्यावे व अपीलकर्त्यांनी लेखी मागणी नोंदविल्यास त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन द्याव्यात.

पुणे
दि. 26 JUL 2010

माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शरद गुंडीबा ताकतोडे
मु.पो.अरूण, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अरण,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शरद गुंडीबा ताकतोडे
मु.पो.अरूण, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.एन.के.बागवाले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अरण,
ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.डी.गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

दलित वस्तीसाठी शासनाकडून ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अरण, ता.माढा, जि.सोलापूर यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शरद गुंडीबा ताकतोडे यांनी केली.

आधीचे ग्रामसेवक श्री.ए.एस.लटके यांनी संबंधित पदभारात कागदपत्रे आपल्याकडे दिली नसल्यामुळे निधीच्या विनियोगाबाबतची माहिती वगळता उपलब्ध माहिती दिली. विहित मुदतीत उत्तर दिले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अरण, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.डी.गायकवाड यांनी केले.

प्रशासकीय कारणास्तव श्री.लटके यांच्यावर कारवाई चालू आहे. कागदपत्रांबाबत त्यांना नोटिसही दिली आहे. त्याची चौकशी पाच-सहा महिन्यांपूर्वी पूर्ण झाली असून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. तथापि श्री.ताकतोडे यांनी मागितलेली सन १९८९-९० पासूनची माहिती कागदपत्रे प्राप्त करून घेऊन देत आहोत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एन.के.बागवाले यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे, व माहिती न देता येण्याबाबतची त्यांची कारणे रास्त आहेत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेल्या निवेदनाप्रमाणे कागदपत्रे प्राप्त करून घेऊन माहिती संकलित करून अपीलकर्त्यास आठ दिवसांत निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२७.५.२०१० व दि.२८.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी माहिती देण्यास समक्ष गेले, परंतु अपीलकर्त्यांनी माहिती घेतली नाही,

म्हणून दि.२८.५.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एन.के.बागवाले दि.२८.५.२०१० च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय महादेव सोनवणे
रायगड राजे संभाजीनगर (प.) तुळजापूर,
जि.धाराशिव **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर,
जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**<br>जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर,<br>जि.सोलापूर श्री.एम.जी.मांडूरके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

फेब्रुवारी २००८ मध्ये अपर जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर यांना दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.संजय महादेव सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगकडील अपिलात केली आहे.

श्री.सोनवणे यांनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज न करता साधा अर्ज केला होता. दि.१७.१२.२००७ रोजी अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाकडे त्यांनी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची व माहितीची मागणी या अर्जात केली होती. परंतु हा अर्ज आपल्या कार्यालयाला प्राप्त झालेला नाही. शासनाकडे मागणी करुनही त्याची प्रत मिळाली नाही. अर्जाची प्रत उपलब्ध करुन घेऊन त्वरित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यांना एक महिन्याच्या आत विनामूल्य द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, जि.सोलापूर यांनी दिले होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे निधन झाले असून शासनाकडून पत्र प्राप्त झाल्यावर अथवा अपीलकर्त्याने नेमक्या माहितीची मागणी स्पष्ट केल्यास पुढील कार्यवाही करता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, जि.सोलापूर श्री.एम.जी.मांडुरके यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.फजलुर रहमान हसनसाहेब फुलमामडी
५४३, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६।०४।२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.फजलुर रहमान हसनसाहेब फुलमामडी<br>५४३, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६४.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण सन १९९० पासूनच्या नेमणुकांच्या अनुषंगाने कादरी प्राथमिक शाळा, औज मंद्रुप या संस्थेची मागितलेली माहिती अपूर्ण व खोटी दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, संस्थेने वृत्तपत्रामध्ये नेमणुकीसाठी दिलेली जाहिरात बनावट असून जन माहिती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले असूनही कारवाई केलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.फजलुर रहमान हसनसाहेब फुलमामडी यांनी केली.

श्री.फुलमामडी यांचा अर्ज दि.२४.३.२००८ रोजी प्राप्त झाला. दि.७.४.२००८ रोजी त्यांना शुल्क कळविले. दि.१७.४.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरल्यावर त्याच दिवशी माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.टी.एच.घाडगे यांनी असे लेखी निवेदनाद्वारे कळविले.

जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन पाहता त्यांनी मुद्देनिहाय उत्तर दिले असून अपीलकर्त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.झेड.एम.हुंडेकरी
प्लॉट नं.१७/६९, शास्त्रीनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक
न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सार्वजनिक
न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित** **अपीलकर्ता** श्री.झेड.एम.हुंडेकरी प्लॉट नं.१७/६९, शास्त्रीनगर, सोलापूर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

'सोलापूर सोशल असोसिएशन' या संस्थेबाबत मागितलेली माहिती दिली जात नाही व संस्थेचे पदाधिकारी दमदाटी करतात, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.झेड.एम.हुंडेकरी यांनी केली.

आपल्या संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदान नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कायदा लागू होत नाही, असे उत्तर संस्थेचे मानद सरचिटणीस श्री.इस्माईल हाजी अ.सत्तार जमादार यांनी श्री.हुंडेकरी यांचा अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांनी संस्थेकडे वर्ग केल्यानंतर दिले. 'आपण काही दिवसापूर्वी एका व्यापाऱ्यास फोनवर खंडणीची मागणी केलेबाबत आपल्यावर जेलरोड पोलिसांनी कारवाई केल्याचे व 'सोलापूर वृत्तदर्शन' या प्रसाįमाध्यमाने सदरचा प्रकार प्रसारीत केल्याचे आम्ही पाहिले आहे, व त्याबाबतचे पुरावे आमच्याकडे आहेत. त्यानुसार आम्हांस मिळेल त्या कायदेशीर सल्ल्यानुसार आपणाविरूध्द कारवाई करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी,' असे मानद सरचिटणीसांनी या पत्रात म्हटले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेला निर्णय लक्षात घेता उपरोक्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे स्पष्ट होते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे

31 JUL 2010